# आकाशवेडी

पद्मा

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
ग्रं. क्र. १७७२
REFBK-0016871
REFBK-0016871

# आ का श वे डी

पद्मा

REFBK-0016871
REFBK-0016871

मौ ज
प्र का श न गृ ह
मुं ब ई ४

मौज प्रकाशन : १६६

पहिली आवृत्ती : १९६८

© १९६८, पद्मा गोळे

किंमत साडेचार रुपये

मुखपृष्ठ :
पद्मा सहस्रबुद्धे

प्रकाशक :
वि० पु० भागवत
मौज प्रकाशन गृह,
खटाववाडी, मुंबई ४

मुद्रक :
वि० पु० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई ४

ठाणे ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम 50049 वि: काव्य
क्रमांक 9662 नोंद दि. 26/12/68

दान १
गणित २
ललाटरेखा ४
भरली ओंजळ जड होते ६
आज चंद्र झालें मन ७
उदास काळोखाच्या सीमा ८
नवलाईचं फूल ९
आम्ही महाराष्ट्रकन्या ११
निरोप १३
दृष्टीला विसावा १५
आईपणाची भीति १६
नियतीचा वाटा १८
क्वचित क्वचित २०
ती २१
राधा २२
वैशाखमासीं २३
आकाशवेडी २४
अर्ध्या वाटेवर २५
मध्येच आठवे २६
जखम २७
ताण २८
पुन्हा पुन्हा मी खोल पाहते २९
सायुज्य ३०
पुरावा ३१
निळेंभोर जळ खाली ३२
खुणा ३३
या एकावन्नाव्या शरदांत ३४
चंद्रकोर ३५
पौषामधली रात्र ३६
वलय ३७
शोध ३९
मनाच्या मनांत ४०
एखाद्या वादळी रात्रीं ४१
या साऱ्यांहून बेभान ४३
भेट ४४
आठवतं फक्त ४५

कसें कळावें ४६
तेव्हाही पण ४७
पन्नाशीचा डोळा ४८
आज मात्र ४९
शिल्प ५१
स्वप्नमहाल ५२
सारें शरीरच जेथें ५३
नक्षत्रदर्शन ५४
पत्र ५५
श्रावणांतल्या रामप्रहरीं ५६
उडते निद्रा ५७
ऋण ५८
मागणें ५९
जेव्हा आठवतात ६०
सप्रेम प्रणाम ६१
रात्र अशी भिजलेली ६२
वेगळी ६३
दोन वाजून वीस मिनिटें झालीं तरी ६४
ओढाळ मेघ ६६
आताशी मी नसतेंच इथे ६७
काळ रांगतो ६९
तुझ्या संगती यावया ७०
त्या रस्त्यावर ७१
चाफ्याच्या झाडा ७२
एस० ओ० एस० ७३
इतकी बेपर्वाई ७४
नजर ७५
निळा पक्षी ७६
हस्तांदोलन ७७
लक्ष्मणरेषा ७८
माझ्यासाठीं ७९
जपायचा एकटेपणा ८०
अजिंठा ८१
थोडी उरली आहे वाट ८२

# आ का श वे डी

# दान

मागायचें असेल दान
तर आभाळापाशी माग
नाही तर सोस अशीच
अभावाची आग.

मागायचेंच कांही
तर सूर्य हवा म्हण :
वेचीत हिंडूं नकोस
विझलेले कण.

रात्रीची ओढणी
मागितलीस तरी चालेल :
तिने तुझी व्यथा तरी
झाकली तर झाकेल !

# गणित

गणित मांडिलें
जन्मजन्मिच्या रविचंद्रांचें
मनांतली बासरी जेधवा गुंजत होती;
वसंत-वर्षा त्यांत मिळविले,
पतझड केली वजा कितीदा
आणिक गुणिलें भाद्रपदांतिल इंद्रधनूने...
कितिदा केलें गणित तरीही
एकच होता दिवस तुझ्यास्तव उरला बाकी
मिरवत आला वादळावरी जो रुद्रापरि
मेघांचे झडवीत चौघडे
जलधारांचीं उधळित पुष्पें
येइ विजेच्या लयींत नाचत;
कर्तव्यांच्या चक्रवाढिंतुन,
व्यवहाराच्या, काळ-काम-वेगांच्या
सगळ्या गणितांमधुनी
एकच होता दिवस तुझ्यास्तव उरला बाकी.

वाट पाहिली तुझी त्या दिनीं !
उभी राहुनी उंबरठ्यावर,
घेउनि हातीं दान आगळें
तिष्ठतिष्ठलें मी एकाकिनि !

आणि अखेरीं—
वाट पहातच मावळला दिन,
शमलें वादळ जिव घेणारें !

तेव्हापासुन
गणित मांडितें
करितें बेरिज
वजा टाकितें
रविचंद्रांना
कितिदा, कितिदा !

# ललाटरेखा

आपल्याच बरगड्या उपसल्यास
तंबूच्या मेखांसाठी,
आतड्यांचे वळून दोर
तणाव्यांच्या बांधल्यास गाठी.

किंनखापांच्या कनातींची
मोतीझालर तुटली आहे;
शस्त्रें कोठे गेलीं सारीं?
सुरई रितीच पडली आहे.

तंबूमधली राजकन्या
मनस्विनी लावण्यमयी
पांच दासींची नजर चुकवून
कशी गेली कळत नाही.

नूपुर मात्र पडले आहेत
गालिच्यावर माना टाकून;
पाहिलीस ? वीणा येथेच आहे :
वेड्या, जाणलीस का ती खूण ?

ऊठ, गुंडाळ कनाती त्या :
निघत नाहीत म्हणतोस खुंट ?
थांबून कसें चालेल आता ?
ते बघ तयार आहेत उंट.

झालरीचे मोती वेचतोस
की शोधतोस पाऊलखुणा ?
पुसल्या असतील आतापर्यंत,
दूर गेला असेल मेणा.

सगळ्यांनीच सोडलें म्हणतोस ?
ही वेदना निष्ठावती
प्रवास सुरू झाल्यापासून
आहेच ना तुझ्यासंगती !

नूपुरांतल्या घागऱ्यांसाठी
वेचला म्हणतोस एकेक प्राण :
काय होती अपेक्षा तुझी ?
ऐकली नाहीस का रुणझुण ?

मनस्विनी येईल परत ?
कशाला मग गेली असती !
वीणा ठेवून गेली आहे :
पूस डोळे, उचल ना ती.

बघतोस काय ? सरला मुक्काम :
उपटून काढ साऱ्या मेखा,
वीणा छेडित पुन्हा प्रवास
हीच तुझी ललाटरेखा !

## भरली ओंजळ जड होते

अशी कशी ही भरली ओंजळ
जड होते रे जड होते
देहमनोबल एकवटुनि मी
कर जरि स्थिर ठेवूं बघतें.

अखेर तो क्षण तसाच जातो,
क्षीण सैल पडती बोटें :
तो जातो अन् ओंजळींतुनी
हळूहळू सारें गळतें.

तसेंच त्याने असें जायचें,
पहायचें तें मीहि तसें :
नियतीने हें दान टाकिलें
परस्परांना ज्ञात असे.

प्राण लावुनी पणा तरी मी
पुन्हा कशी ओंजळ भरतें !
स्तनांस भरल्या लागावी कळ
तशीं पुन्हा दुखती बोटें.

क्षण येतो अन् तसाच जातो...
तशीच मी खिळतें येथे
आणि पुन्हा ही भरली ओंजळ
जड होते रे जड होते !

# आज चंद्र झालें मन

आज चंद्र झालें मन,
शोधी चंद्रवेडा कोटे :
त्याच्याविणें हें चांदणें
कापूर हो आणि पेटे

कसा केव्हा सागराचा
त्याला लागलेला लळा;
कलेकलेने झुरतें :
मूकपणें सोशी कळा.

लाट लाट भरतीची
त्यास करिते बेभान;
हसे चौदा पाकळ्यांनी
विसरून जगा पूर्ण.

चंद्र चंद्र होतें मन :
कसें झाकावें कळेना;
असें झुरे, असें फुले :
शेव नभाचा पुरेना !

# उदास काळोखाच्या सीमा

उदास काळोखाच्या सीमा
अनवधान मी मोजित होतें;
अनवधान ? छे ! अननुभवी मी
रेखा-रेखा निरखित होतें.

लाटा लाटा उसळत येती
गिळीत सीमा एक-एक अन्
असीम काळा उदास सागर
बघतें मी तर अवाक होउन.

मला वाटलें, सहजच लंघिन
काळोखाची सीमा ही-ती :
येतिल सामोऱ्या मज हासत
उजळ शांत सुप्रकाश ज्योती.

कुठल्या ज्योती ?—सागर काळा
हळूहळू हा पुढे सरकतो...
काळोखाची सीमा कुठली ?
कुठे संपते ? कोण सांगतो !

## नवलाईचं फूल

कधीमधी माझ्या बागेंत
नवलाईचं फूल येतं :
हव्या त्याच शब्दावाचून
त्याला फुलायचंच नसतं.

तें जाणतं आभाळमाया,
ती नजर, तो स्पर्श;
दवडोळ्यांत आभाळ बघतां
मावत नाही मनचा हर्ष.

सूर्य होऊन आभाळ जेव्हा
हृदयाशी त्याला धरतं
मन भरून येऊन फूल
जसं कांही फुटूं बघतं.

आभाळ जर फुलासाठी,
इतक्या वरून खाली येतं
सूर्य होऊन, वारा होऊन
कुरवाळतं, आंदुळतं,

केव्हा तरी पाखरू होऊन
कां त्याच्याशी बोलत नाही ?
गंभीर मौन सोडून जरा
वेल्हाळ कां होत नाही ?

"दुसरं कांहीच प्रिय नाही
माझ्या फुला, तुझ्याएवढं."
कां असं म्हणूं नाही
आभाळानं लाडंवाडं ?

फूल म्हणतं, "अशा त्याच्या
बोलावाचून फुलणार नाही,
अशीच कळी गळेल मातींत
मला त्याची पर्वा नाही !"

## आम्ही महाराष्ट्रकन्या

आम्ही महाराष्ट्रकन्या
माय मराठी आमुची;
स्वर्गांहुनीहि आम्हांला
माया मराठी भूमीची.

काळा सह्याद्रीचा कडा
कळसूबाईचें शिखर
कृष्णाभीमागोदेसंगें
आहे आमुचें माहेर.

मुक्ता, जना जागविती
भोळ्या भक्तीनें पहाटे,
जिजा, लक्ष्मी शिकविती
आम्हां स्वातंत्र्याचीं गीतें.

आम्ही महाराष्ट्रकन्या
कुळधर्म भागवत,
आम्हां विठूच्या लेकरां
एक विठूचीच जात.

आम्ही महाराष्ट्रकन्या
नका जाऊं कोणी वाटे :
हिरव्या काकणांत आहे
गुप्त तलवारीचें पातें.

म्हणा कळ्या या जाईच्या
परी मायभूमीसाठी
करूं हातांचीहि ढाल
बाळ बांधूनिया पाठी

अवघ्या भारताची सेवा
बाणा आमुचा मराठी,
प्राण तळहातावरी
देशासाठी, धर्मासाठी !

# निरोप

बाळ, चाललास रणा
घरा बांधितें तोरण
पंचप्राणांच्या ज्योतींनी
तुज करितें औक्षण.

याच विक्रमी बाहूंनी
स्वतंत्रता राखायाची,
खांद्यावरी या विसावे
शांति उद्याच्या जगाची.

म्हणूनिया माझ्या डोळां
नाही थेंबही दुःखाचा :
मीहि महाराष्ट्रकन्या
धर्म जाणतें वीराचा

नाही एकहि हुंदका
मुखावाटे काढणार.
मींच लावुनी ठेविली
तुझ्या तलवारीला धार,

अशुभाची साउलीहि
नाही पडणार येथे;
अरे, मीहि सांगतें ना
जिजा-लक्ष्मींशी नातें.

वि: काव्य

तुझ्या शस्त्रांना, अस्त्रांना
शक्ति देईल भवानी,
शिवरायाचें स्वरूप
आठवावें रणांगणीं.

धन्य करीं माझी कूस
येईं विजयी होऊन,
पुन्हा माझिया हाताने
दूधभात भरवीन !

## दृष्टीला विसावा

पडूं पडूं अशी भीति दाखवणारे,
ओथंबलेले, अक्राळविक्राळ काळेकुट्ट ढग,
रुद्ध, क्रुद्ध वासनेसारखी कढत कुंद हवा,
निरुद्योगी, बथ्या एकदोन ठेंगण्या टेकड्या,
फाटतां येत नाही, फुलतां येत नाही
आणि पळूनहि जातां येत नाही
म्हणून उरावरचें जीर्ण देऊळ उरावरच राहूं देऊन
ओसाडपणे पसरलेली रखरखीत जमीन,
पडक्या देवळाच्या मोडक्या कळसाजवळ
फटीतून वर आलेलीं दोन तांबूस नाजुक
पिंपळपानें...
तेवढाच दृष्टीला विसावा !

## आईपणाची भीति

आजच्या इतकी आईपणाची
भीति कधीच वाटली नव्हती,
अगतिकतेची असली खंत
मनांत कधीच दाटली नव्हती.

विचारलेंस आज मला,
"आई कोणची वाट धरूं ?"
गोळा झाले कंठीं प्राण
आणि डोळे लागले झरूं.

कोणची दिशा दाखवूं तुला ?
पूर्व ? पश्चिम ? दक्षिण ? उत्तर ?
माझ्यासारख्याच भीतीने या
चारी दिशा झाल्या फत्तर !

कोठे ज्ञान, यश, सुख ?
काय त्यांच्या खाणाखुणा ?
या-त्या रूपांत दिसतो
सैतानच वावरतांना.

जळीं, स्थळीं, आकाशींहि
अणुबॉंब झाकला आहे,
प्रत्येक रस्ता माणसाच्या
रक्ताने रे माखला आहे.

आज आईच्या कुशींतसुद्धा
उरला नाही बाळ, निवारा :
द्रौणीच्या अस्त्रासारखा
हिरोशिमाचा बाधेल वारा.

कोठे तरी गेलेंच पाहिजे :
गतीचीहि आहेच सक्ती;
जायचें कसें त्याची मात्र
कुणीच सांगत नाही युक्ति.

खचूं नको, शोध बाळा
तुझा तूंच ज्ञानमार्ग :
कोणचीहि दिशा घे
पण माणुसकीला जाग.

धीर धर, उचल पाय,
आता मात्र कर घाई :
आणखी एक लक्षांत ठेव
प्रत्येकालाच असते आई !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ........ दि: ........
क्रमांक ........ नोंद दि ........

## नियतीचा वाटा

किति वर्षें तरि पहात होतें दुरुन सुवर्णकळस,
हिरव्या लाटा अवतीभवती, मधून खुलतो पळस.

म्हणती कोणी झाडीमधली अवघड आहे चढण,
दार सापडूं नयेच असली आहे फसवी घडण.

कुणी सांगती गुप्त नदीचा भवती आहे विळखा :
जाइल बुडुनी बेसावध जर असेल पथिक अनोखा.

कुणी पाहिल्या जाइजुईच्या पायघड्या मार्गांत,
छेडित वीणा गीत गात कुणि जाती येती भक्त.

कुठे लाविले कमनींतुनी झुंबर नक्षत्रांचे,
कुठे सोडिले घड द्राक्षांचे, सडे गुलाबजलाचे.

म्हणती येतो गंध फुलांचा, आरतिचा ये नाद,
कुहूकुहूचें सांद्र निमंत्रण आणि गूढ पडसाद.

वेडावुनि मी धुंडधुंडिल्या दाहिदिशा घनदाट :
राजमार्ग तर एकहि नाही, नाही पाउलवाट.

अखेर बुडतां घन अंधारीं, प्रकाशरेखा दूर
दिसतां गेलें धावत, बघतां खिळलें होउनि चूर.

लाख मस्कती डाळिंबांना फोडुनि केली वाट
की स्वर्गांतुनि लुटुनि आणिली कोणीं माणिकपेठ ?

त्या फुलत्या अग्नीला होता धुंद अनाम सुवास :
ओढ तयाची अशी विलक्षण मन हो कासावीस.

मंदिरास त्या जायासाठी असतिल हजार वाटा :
मला मात्र गवसला अग्निपथ हा नियतीचा वाटा !

## क्वचित क्वचित

क्वचित क्वचित अगदी क्वचित पडतां शय्येवर,
वैशाखीं चंद्राची चंदेरी दुशाला झुलतां अंगावर,
जशी का पाहिली आताच आताच डोंगरमाथ्यावर
मंगलोरी कौलांची रानच्या डौलाची बंगली ऊबदार.
तांबड्या कौलांच्यावरून धुराची वेल ये निळीशार
स्वागत करून हसून खुणावी : उघडें आहे दार,
तांबड्या मातींत तांबड्या विटांची जशी की माहेरवाट.
छोट्याशा बागेला छोट्याशा ओट्याला आपलेपणाचा घाट;
सासूरवाशीण उभी विनयानं : दारची जुईची वेल,
परस-अंगणीं तुळस सावळी आणिक विरक्त बेल;
अंब्याला टांगिला दोरीचा झोपाळा झुलतो वाऱ्याने मंद,
मातींत नाचलीं चिमणीं पावलें निरखी गुलाबगेंद;
तेथून पाहिली सूर्याची सोन्याची घागर बुडतांना,
येथून ऐकिल्या सुरेल गळ्याच्या भूपाळ्या जोडताना.
ओळख घाटांत, स्वागत वाटांत, ओलावा फुलाफुलांत;
मलाच स्मरेना कोठली ओळख! जातें मी खोलाखोलांत...
भास हे होतात, ध्यास लावतात, कवंद मुखीं विरे,
डोंगरवाऱ्याच्या मोकळ्या वासानं जीव हा हुरहुरे.

# ती

दैवी की मानवी ? की चित्रच चालतेंबोलतें ?
पहाटच्या धुक्याचीच घडवावीशी नाजुक वाटते.
लीन डोळ्यांमधून माया शिंपीत साऱ्या घरावर
नऽ वाजत्या पावलांच्या रांगोळीने सजवी घर.
कसलेंहि वस्त्र अंगीं सोनसळीची कांति लेतें,
काचेच्या कंकणांतून रत्नांची दीप्ति झरते.
शब्दासाठी आसावतें घर; शब्द येतो हळू ऋजू :
भूपाळीने हळूच घरीं व्हावें जसें झुंजूमुंजू.
तिच्यामुळे घर होतें देवघरच जसें कांही,
तिचें चंदन, तिची पूजा कोनाकोनांत भरून राही.
तिच्या श्वासाशिवाय घरचें पानसुद्धा हलत नाही
तरी तिच्या अस्तित्वाची जाण कुणाला होत नाही.
एकच मात्र तिला लागतें : नैवेद्य जगावेगळा
आणि तोहि एकांतात शेल्याने झाकलेला.
घरामधलें सारें दुःख, अपमान, अशांतता
निगुतीने वाढून घेते हीच आपल्या ताटात स्वतां :
असें दुःख गिळीत गिळत मनचें मोहळ पिळीत असते
त्या मधांत सगळें घर नहात असतें, पोहत असतें !

## राधा

संसारांत कणोकणीं
रुजलेलें माझें व्रज
कोणा पाप्याच्या दृष्टीने
काय वठणार आज ?

कधी पुराने वाऱ्याने
मन जातां उन्मळून
कृष्ण कृष्ण जपतच
गेलें सारें ओलांडून.

लय वेणूच्या स्वराची
होती कठोर कर्तव्या,
खोल डोहांतहि नाही
कधी नांदला कालिया.

नाही राधापण सोपें :
जीव झोकावा पुरांत
लागे अनय सोसावा
उभा जन्म संसारांत.

जन्मोजन्मींच्या तपाने
येतां असें राधापण
होते यमुनाहि राधा
होतो राधामय कृष्ण !

## वशाखमासीं

वैशाखमासीं नवपर्णराशी
आकाशीं लाविती डोळे
पाहतें पाहतें तशी तुझी वाट
माझें हें हृदय भोळें.

तप्त हो धरती, निःशब्द वारा,
भरून येतात मेघ,
चाहूल ऐकतां माझिया मनाची
होते आर्त तगमग.

तसेच जातात उपेक्षून मेघ,
टाकितात पानें माना
कशाला म्हणूं मी सहवेदना ती
व्याकूळ करिते प्राणा !

## आकाशवेडी

मी एक पक्षीण आकाशवेडी,
दुजाचें मला भान नाही मुळी;
डोळ्यांत माझ्या असे एक आकाश,
श्वासांत आकाश, प्राणातळीं.

स्वप्नांत माझ्या उषा तेवते अन्
निशा गात हाकारिते तेथुनी,
क्षणार्धीं सुटे पाय नीडांतुनी अन्
विजा खेळती मत्त पंखांतुनी.

अशी झेप घ्यावी, असे सूर गावे,
घुसावें ढगामाजि बाणापरी,
ढगांचे अबोली भुरे केशरी रंग
माखून घ्यावेत पंखावरी.

गुजें आरुणी जाणुनी त्या उषेचीं
जुळे का पहावा स्वराशी स्वर,
बघावी झणत्कारिते काय वीणा
शिवस्पर्श होतांच तो सुंदर.

किती उंच जाईन, पोचेन किंवा
संपेल हें आयु अर्ध्यावरी,
आकाशयात्रीस ना खेद त्याचा
निळी जाहली जी सबाह्यांतरीं !

## अर्ध्या वाटेवर

अर्ध्या वाटेवर
आवडतो देखणा गुलमोहर :
वाटतं, जरा फिका असता तर !

अर्ध्या वाटेवर
दुसऱ्याची पुरती ओळख पटते :
स्वताची अर्धीच हें मनांत सलतें

अर्ध्या वाटेवर
पहिले सगळे कोवळे सूर
हळूहळू सरतात दूर.

अर्ध्या वाटेवर
पाय थोडे थबकतात :
कुठे आलों बघतात.

अर्ध्या वाटेवर
प्राण जरा दचकतो :
कानोसा घेऊं लागतो.

अर्ध्या वाटेवरहि पण
एक क्षण असा येतो
वाटच पुसून टाकतो !

# मध्येच आठवे

मध्येच आठवे घटप्रभे तुझ्या
तीरींचें अपूर्व चित्र :
जातांना सूर्यानें बुद्दयाच टाकिलें
जळांत रेशमी वस्त्र,
नाजूक लहरी, झुले शेला वरी,
भोवतीं जांभळें गूढ,
दाबून काहूर उभी संध्या तीरीं
उन्मन अशब्द मूढ.

# जखम

वार झेलला तसाच
हारहि कां पेलावा ?
भार दुहेरी असला
कां निमूट सोसावा ?

नकळत ये वार परी
हसत हार ये पुढून :
हाराची जखम खोल
साहिल का दुखरें मन !

## ताण

नको नको म्हटलं तरी
ताण असे ताणतात,
डोळां पाणी आणतात...
जवळ-जवळ येण्यासाठी
बांधलेल्या निरगाठी
सुट्टं सुट्टं म्हणतात.

# पुन्हा पुन्हा मी खोल पाहतें

पुन्हा पुन्हा मी खोल पाहतें हृदयीं डोकावुन :
जिथे स्थापिली तिथेच आहे मूर्ति स्थिर-आसन;
अशब्द एकांताने भरला गाभारा गंधित,
तशीच आहे तमास उजळित अविचल ती ज्योत;
तशींच ताजीं प्रसन्न पुष्पें आणि धूतवसना,
तशीच आहे भावपुरंध्री अचल ध्यानमग्ना;
अन् मूर्तीच्या अधरावरही हास्य तेंच मधुर,
वरदानोत्सुक लोचनांत त्या तोच भाव अधिर;
न्यून कुठे तें मुळी दिसेना, पण सलतें मात्र
शोधण्यास त्या प्राण भिरभिरे दिवस आणि रात्र.

## सायुज्य

उधाणाचा, ओहटीचा
खेळ संपला ओढाळ;
आता हृदयांत बिंबे
निळें आकाश केवळ.

खडा फेकितांच कोणी
जळ मनीं थरारतें :
घालूनिया त्यास पोटीं
मंदमंदसें हासतें.

काठावरच्या तरूंची
छाया घेतें साठवून;
नाही कढतकुढत
ग्रीष्म-वर्षा आठवून.

निराकार आकाशाशी
आता सदाचीच मैत्री :
एक जाहलें आकाश
जळाचिया गात्रीं गात्रीं.

निरंगाचा रंग निळा
निसंगाचा संग निळा :
निळ्या आकाशजळाचा
नित्य सायुज्यसोहळा.

## पुरावा

तो नव्हता—नाही—म्हणावयाला धैर्यच नाही
होता—आहे—म्हणावयाला काय पुरावा ?
नाही मंदिर, नाही दर्शन, प्रसाद नाही,
नाहित तीर्थक्षेत्रें जेथे व्हावी यात्रा;
परंतु निश्चित—तो नसता तर तीही नसती :
ती·आहे हा—माना किंवा सोडा—
केवळ त्याच्या अस्तित्वाचा
ती आहे हा सबळ पुरावा !

# निळेंभोर जळ खाली

निळेंभोर जळ खाली
दिवस वाकुनी बघतो :
बघुनि काय सजल नेत्र
दचकुनि मागे वळतो ?

निळें निळेंभोर गगन,
रात्र सभय वर बघते :
स्पर्श एक जाणवुनी
अपुल्याशी थरथरते.

निळेंभोर जळ खाली,
निळें निळें नभ वरती
आणि मधे मंत्रमुग्ध
दिवस किती ! किति रात्री

# खुणा

किति अलगद पाउल टाकित आलें
तरिही उठल्या खुणा :
पाहीन पुसाया, होतिल ठळकच
आणि बोलक्या पुन्हा !

# या एक्कावन्नाव्या शरदांत

या एक्कावन्नाव्या शरदांत
दूरच्या शिशिराची अस्पष्ट साद
कानांना ऐकू येत असली तरी
—तरीहि आठवतात ते तेच ऋतु फुललेले, सुकलेले,
बकुळीच्या फुलांसारखे सुकूनहि दरवळलेले.
ग्रीष्मांतलीं वादळें, आषाढांतला वर्षाव
यांच्या आठवणी अशा आहेत,
शंभर वसंत-शरदांनी त्यांत चिंब भिजून जावें;
रुक्मिणीसारखें मीहि एका तुळशीच्या पानाने
तुळिलें आहे अवघें जीवन;
पारिजात माझ्या अंगणांत फुलें ढाळतो आहे :
मी अजूनहि फुलें वेचतें आहे
दूरच्या शिशिराची साद
अस्पष्ट ऐकूं येत असली तरी.

## चंद्रकोर

मेंदी-रेखलीं पाउलें
उगा येती डोळ्यांपुढे,
किणकिणती कानांत
नाजुकसे हिरवे चुडे.

सारखीच लगबग
जोडव्याच्या तालावर,
इथे तिथे झगमगे
सोनसळीची किनार.

उगीचच पानोपानीं
जाई दारची लाजते,
दाराआडून कुणाचें
मुख लाजरें साजतें ?

कळी कुठे तें कळेना,
गंधें कोंदाटतें मन :
आगमनाचे तिचिया
मोजितें मी क्षणक्षण.

ये ग माझ्या, चंद्रकोरी !
उजळाया माझें घर :
माहेराच्या ममतेने
उभें स्वागता सासर !

## पौषामधली रात्र

पौषामधली रात्र तळमळे प्रौढ पुरंध्री !
गालाभालावरी उमटलीं
दुःखाचीं पदचिन्हें निष्ठुर !
केश विखुरले फिक्या निळ्या रेशमी उशीवर,
रात्र तळमळे पुन्हा उकलल्या जखमा सोसत
लाल झिरपत्या...
चैत्रामधले लाल धुमारे अदृश्य ज्यांची जीवनप्रीति,
ग्रीष्मामधलीं तीव्र वादळें
नाशांतुनि पेरिले जयांनी माणिकमोती !
वर्षेचीं तीं सगर्भ दुःखें !
इंद्रधनूची कव्यार गंधित
कायमची जी उरांत रुतली
ओतित अमृत नसानसांतुनि.
अटळ बहर तो ! आणि अता ही अटळ पानगळ !
जीवन हें ? छे ! कठपुतळीचें केवळ नर्तन !
घुंगुर तुटले, सूर थांबले, तरिही—तरिही
ऊर फुटेतो नाचायाचें असेंच अगतिक !
धुक्यांत लपलीं क्रूर वादळें साहत साहत
रात्र तळमळे पौषामधली—ही एकाकिनि !

# वलय

सतारीचें टंव टंव
थेंब थेंब ठिबकत आहे :
एक एक वलय वलय
आतबाहेर उमटत आहे.

वलय वलय लय विलय
थेंब थेंब टंव टंव...
रक्तभोवळ गिर्की घेते,
नीरवाला लाख रव.

वलयांची लय पकडून
तूं कसा आत शिरलास?
द्रुतांत, विलंबितांत
सुगंधित मध भरलास?

आर्त उंच स्वर स्वर
चांदण्यांत भिजून आले,
वलय वलय सूक्ष्म होत
खोल खोल मनांत गेले.

हळूहळू वलयांच्या
विळख्यामध्ये बद्ध प्राण,
टंव टंव वाचून कसलें
उरलें नाही दुसरें भान.

एका एका विळख्यामधून
नवा हर्ष, नवी व्यथा,
नवी गत, नवें गीत,
एक नवीच स्वरकथा.

स्वरांचा हा गळ टाकून
काय उपसून काढतो आहेस ?
जपलेलें, लपलेलें
उघड्यावर टाकतो आहेस ?

खुशाल टाक, काय पर्वा !
मी तर आता सुटतें आहे :
तुझी माझी एक लय
वलयांत मिटते आहे.

सतारीचे टंव टंव
तू मी—मी तूं
थेंब थेंब वलय वलय
लय विलय...मी–तूं !

# शोध

सारखा शोधतो पश्चिमवारा :
काय हरवलें आहे त्याचें झाडांत ?
सारखा भिरभिरतो निळा पारवा :
काय पडलें आहे त्याचें आडांत ?
पाठीवर दिवा घेऊन काजवा
तळमळत काय शोधतो अंधारांत ?
मीहि सारखी चाचपडतें, शोधतें :
काय हरवलें आहे माझें माझ्यांत ?

# मनाच्या मनांत

मनाच्या मनांत पोरका आनंद
बागडे स्वतांशी एकटा स्वच्छंद :
स्वर्गांतला चंद्र हाताशी आलेला
सांगावा कोणाला, दावावा कोणाला ?

मनाच्या मनाला अगणित कळा :
तयांतून एक दुःख आलें फळा;
तेंहि एकलेंच अभागी अनाथ,
त्याच्या आर्त गीता नाही कोणी साथ.

पोरका आनंद झाला हिरमुष्टी,
दुःखहि अनाथ एकलेंच कष्टी;
तोंच मनीं एक मूर्ती प्रकटली,
मनालाच आर्द्र हाक ऐकूं आली.

धावला आनंद, दुःखहि धावलें :
एकाच मिठींत दोघेहि मावले !

## एखाद्या वादळी रात्रीं

एखाद्या वादळी रात्रीं
युगायुगांची जड शिला
करकरत बाजूला होते
आणि गुहेंतलीं लेणीं जिवंत होतात.
पुराणांतल्या, इतिहासांतल्या
सगळ्या सती, महासती, राण्या, महाराण्या
डोळ्यांतून अग्निवर्षाव करीत विचारूं लागतात
जाब जीवनाचा मनस्विनीला,
त्या शापित गायिकेला.

मोहांच्या मोहळांत राहणारी ती भित्री, अगतिक
कशी देणार त्यांच्या नजरेला नजर ?
तिचे डोळे खिळतात जमिनीवर अपार लीनतेनं,
जमिनीतून वाहूं लागतो एक प्रवाह झुळूझुळू,
आकाशाच्या गर्भांतून तरंगत येतो
एक आर्त मधुर स्वर जुईच्या गंधासारखा,
वादळ मंद होत होत आकार घेऊं लागतें
एका युगकल्पित स्त्रीदेहाचा :
कमरेवर कलश, माथ्यावर कलश
आणि डोळ्यांत अथांग आकाश.
गात गात पाणी चढतें
त्या वादळशिल्पाच्या कमरेला विळखा घालीत
मनस्विनीच्या गाण्याबरोबर;
काठावरच्या वृक्षांच्या पानापानांतून
घुमूं लागतात पाण्याचे स्वर;

सतींच्या, महासतींच्या, राण्यांच्या, महाराण्यांच्या
डोळ्यांतील अंगारांची होऊं लागतात फुलें;
विसरतात साऱ्याच
ओठावरलीं पहिलीं स्तोत्रें
ओचे सावरीत उतरतात हळूच यमुनेच्या जळांत
हातांत नसलेली घागर भरून घेण्यासाठी !

# या साऱ्यांहून बेभान

अक्षरांचा ढोबळपणा ज्याला सोसला नसता
असलें कांही...
स्वरांचे घुंगुरहि मानवले नसते
असलें कांही
पारिजात वाटावा बोजड असें कोमल,
गंधाचे वाटावे बंध असें तरल.

वनराईने हिरवी मदिरा पाजली त्याला,
चांदण्यांच्या तेजाचा झोकला अर्धा पेला,
वाऱ्याच्या गतींतली थोडी अधीरता,
पहाटेचा स्पर्श निसटता,
नाजुक मर्मांतिकांतलें तीक्ष्ण टोकदार
उफाळून आलें आत्म्यामधून
चारी भिंतींना अभिंती करीत !
त्याला कसलें नांव ?
वनराई ? पहाट ? वारा ?
या साऱ्यांहून बेभान असलें कांही ?

# भेट

नेहमीच कशी आपली भेट ही पहिलीच भेट असते!
संकोचाची खोल दरी मध्ये पसरलेली दिसते!
पहिल्याच डोळाभेटींत कशी जन्मजन्मींची ओळख पटते,
उपचाराच्या हात जोडण्यांत सगळी दरी जुळून जाते!
चारच वाक्यांत पुन्हा जमतें नांव नसलेलें अतूट नातें,
मनामधलें वाळलें सुकलें हिरवें होऊन चमकून उठतें!
एखाद्याच सौम्य हास्यांत व्यक्त होतात कोमल कथा,
नकळत सोडलेल्या एका उसाशांत वाचतां येतात मनोव्यथा,
एकदम होतें निरभ्र आकाश ताजें प्रसन्न टवटवलेलें,
सगळया वेली सगळे वृक्ष फळाफुलांनी लवथवलेले,

मधले दिवस, महिने, वर्षँ—की मधे कांहीच नसतें?
नेहमीच ही पहिली भेट—आणि आकाश निरभ्र होतें!

## आठवतं फक्त

तूं माझ्या केसांवर ओठ टेकले होतेस का ?
आठवत नाही :
पण जाणवतात फक्त दोन चंद्र-सूर्य झगमगणारे
आणि कपाळावर भांगापाशी झिळमिळणारं
जडावाचं फूल.

तूं माझ्या डोळ्यांत पाहिलं होतंस का ?
आठवत नाही :
पण आठवतात दोन अथांग समुद्र
ज्यांत हसत होतीं कमळंच कमळं
मला पाकळ्यांत झेलून घेणारीं.

तूं मला हाक मारली होतीस का ?
आठवत नाही :
पण आठवते एक मालकंसाची धुंद गत
अनावरपणे माझ्या सतारीला छेडून जाणारी

पण...पण तू आलाच होतास का ?
आठवत नाही :
आठवतं फक्त पहाटेचं धुकं आणि...
आणि त्यांत अलगद मिसळू पहाणारा
अंधुक अंधुक शुक्रतारा !

## कसें कळावें

कसें कळावें :
वनराईची हिरवी मदिरा इतुकी चढते,
तमबर्फाने फसफसुनी ती अशी वाहते;
मातींतुनही यक्षवनांतील सुगंध सुटती,
रात्रीमधले शत रागांचे सूर वेढिती;
पिळुनि चांदण्या मद्याची कुणि नशा वाढवी,
स्वप्न-वास्तवामधली रेषा पुसुनी जावी.

कसें कळावें :
पहाट अवचित उघडणार क्षण द्वारहि मधलें...
आणि अकल्पित स्वप्नांतच हें पाउल पडलें !

# तेव्हाही पण

केव्हातरि तरि या स्वप्नांतुनि
पडेन का मी बाहेरी ?
एकदाच, जाइन जेव्हा मी
अखेरच्या त्या माहेरीं.
तेव्हाही पण असेल माझ्या
सूत्र प्रीतिचें हेंच गळां,
भाळावरती असेल तेव्हा
अहेवतेचा हाच टिळा !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ५००४५ वि: काव्य
क्रमांक ९५७२ नों. दि. ३/८/९५

## पन्नाशीचा डोळा

पन्नाशीला एक नवीन डोळा फुटतो
त्याच्या बुबुळाला नसतो रंग ना बाहुली,
असतो फक्त एक बाण सदा आत रोखलेला,
'क्ष' किरणांनी न्याहाळणारा,
नको तें जाळून शुद्ध करूं पहाणारा,
हृदय, फुफ्फुसें, मेंदू—
मेंदूच्या गुंतावळींतून पहातो आरपार
न दचकतां, न बिचकतां
पण गटंगळ्या खातो हृदयांतल्या रक्तांत.

पन्नाशीचा डोळा नसतो भोळा,
नसतो सोवळा, पण असतो ओला;
साहतो जखमा, पाहतो काटे,
गालांवरचे आसवांचे फराटे.

पन्नाशीचा डोळा असतो तिसराच,
पण भिजलेला, रतीच्या शोकानं थिजलेला
आत्मपरीक्षेनं जरासा बुजलेला!
त्याला सोबत करते एक भावना :
चेहरा न दाखवणारी, शुभ्रवसना, संन्यासिनी,
फुलांना कुरवाळीत बसणारी :

पन्नाशीचा डोळा तिला डोळा भरून पहात पहात
हसतो कधीकधी अतीव प्रसन्नतेनं—
रडतां रडतां...

## आज मात्र

आजवरी कधी कसें
नाही भासलें अंतर :
अंतरानेहि जाहलें
नाही मन हें कातर.

होतीं वळणें-वाकणें
त्यांत विसाव्याला जागा :
नकळत गुंफलेला
रेशमांत जरीधागा.

दोन टोकांवर दोघें
मधे अबोलकी ऊब :
दोन किनाऱ्यांत जसा
एक शद्बातीत लोभ.

क्षणभर व्हावा भास :
वाट वाटेला मिळावी;
चाले चकव्याचा खेळ :
वाट जुळावी, फसावी.

चकव्यांत होती माया,
होता निराळाच घाव :
तशा सुखदुःखासाठी
रोज ओवाळावा जीव.

आज मात्र येथे तेथे
फक्त बोचतो गारठा,
शब्दाविणे शस्त्राविणे
साऱ्या रोखलेल्या वाटा.

## शिल्प

पहाट विस्मित,
धुकें सुगंधित :
शिल्प अकल्पित
त्यांत कोरिलें
कसें कुणीं ?
कुणाकुणाच्या
मनामनावर
चिरमुद्रित त्या
मंदिर सचेतन
आठवणी !

## स्वप्नमहाल

असा कसा स्वप्नमहाल : दारें त्याला सात,
सात रंग, सात पाकळ्या, मनोरेहि सात,
पहिल्यांतून गेलें आत; न्हालें चांदण्यांत,
दुसऱ्यामध्ये गुरफटलें मी इंद्रधनुष्यांत;
तिसऱ्यामधून पुढे आले अमृताचे पेले;
चवथ्यामध्ये फुलांचे झेलेच झेले;
पाचव्यामधले रत्नहार घालू तरी किती ?
सहाव्यांतल्या ऐश्वर्याची कशी करूं मिती ?
सातव्यांत ? कसें सांगूं काय बाई देखलें :
कुणीतरी ओठांनीच माझे डोळे झाकले !

## सारें शरीरच जेथे

सारें शरीरच जेथे
आज गाळितें आसवें :
ओठ दोन आवळून
दुःख कसें हें झाकावें ?

आजवरी हृदयांत
काळीकुट्ट दुःखधार
बंद करून ठोकिली
वर हास्याची मोहर.

मन कढलें कढलें,
दुःखरसायन कढे :
बंद मोहर उडाली,
धार आकाशाशी भिडे.

नसावेत कुणा डोळे
दुःखधार ती पहाया,
नसावेत कान कोणा
तिचा आक्रोश ऐकाया...

नसावेत नसावेत
जीभ बिचारी घोकते;
असावेत एकातरी
मन आंतून कण्हतें !

## नक्षत्रदर्शन

जेव्हा मी नक्षत्रदर्शन करावयास गेलें होतें
तेव्हा होता फटक उजेड
अस्तित्वाला अंधारून टाकणारा.
उजेड उतरतीला लागला
आणि नक्षत्र दिसलें;
पण आधीच पायांनी माप सांडलें होतें
नक्षत्र डोळ्यांत धरतां आलें नाही,
माप पुन्हा कधीच भरतां आलें नाही

## पत्र

पत्र पत्रासारखेंच
पण त्यांतहि
काना-मात्रा-वेलांटीची ऐट गुंतवणारी,
अक्षरांचा उभट गोलपणा आश्वासन देणारा,
सुटेपणांत थोडी बेपर्वाई,
कांहीसा मोकळेपणा;
प्रथम सप्रेम नमस्कारच
पण उपचार वगळणारा, 'स'ला सार्थ करणारा;
विरामचिन्हें – अविरामचिन्हें
बरेंचसें झाकणारीं,
तुटक तुटक सांगणारीं;
शेवटी लोभ असावा या विनंतींतहि
'असावाच'चा आर्जवीपणा
आणि आग्रह : जाणत्यालाच समजणारा.
पत्र पत्रासारखेंच
पण...त्यांतहि—

## श्रावणांतल्या रामप्रहरीं

श्रावणांतल्या रामप्रहरीं
माड दिसतात प्रसन्न, माथ्यावर ऊन मिरवणारे;
डेरेदार सहकार किंचित गंभीर,
जुइतेरड्यांचे कौतुक करणारे;
गुलाबाच्या ताटव्यांत बुलबुल गातो
मोकळ्या गळ्याने सखीसहित;
पपया भरू लागतात केशरी रंगाने
साळुंकी आलापांच्या द्रुतलयींत;
तारेंत अडकलेल्या वटवाघुळाला
टोच्या मारतो कावळा बुभुक्षित:
मखमली गालिच्यावर जणु चुकून पडलेला
शाईचा ठिपका बटबटीत;
माथ्यावर सावळे मेघ; तरी माझ्या मनांत
उमटतें हें चित्र, तें चित्र:
मी शोधीत बसतें त्यांचा अर्थ
दूर क्षितिजापर्यंत पसरलेल्या
हिरव्या रंगाच्या लाटालहरींत—श्रावणांतल्या रामप्रहरीं!

# उडते निद्रा

उडते निद्रा:
साहतें न तिज घरटें ओलें—जरी मखमली;
आषाढाच्या संतत धारा—तरी तळखली!
लावुन घेउन घट्ट कवाडें
कोंडूं पाही घरटें तिजला:
तिला न साहे शिक्षा असली!
तडफड! फडफड! ओल! तळखली!
अखेर पडतां मध्यरात्रिचे टोले बारा
धडक मारुनी उघडुनि दारें
उडते निद्रा.
शोधित फिरते
पतिव्रता, व्रतधरा, वत्सला, ती एकाकिनि.
कुठे दिसेना...
फिरते गरगर! फिरते भिरभिर!
काळ्या पड्यामागे दिसते अंधुक मूर्ती:
वदनावरची मूक वेदना,
ओठावरची हाक अनाहत.
कसें पोचणें पड्यामागे?
काळोखाच्या खडकावरती
धडका मारित फिरते निद्रा.
अखेर येतो पहाटवारा
कनवाळू, अनुभवी, जाणता:
मायेने समजावी तिजला.
थकते निद्रा, अखेर शिरते त्या घरट्यांतच
अश्रूंची अंजली समर्पित!

## ऋण

याचें देणें त्याचें देणें
किती हिशेब करावा ?
ज्याचें त्यास द्यावयास
पसा कितिदां भरावा ?

देणीं फेडून सव्याज
वाटे भार शिरीं राही :
तुझें अमोज तें ऋण
माझी शिरोभूषा होई.

नाही धन, नाही हात
माप भरावया त्याचें :
अमाप तें तरी नाही
त्याचें शिरावरी ओझें.

ठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ........................ दि: ........................
क्रमांक ........................ नोंद दि ........................

## मागणें

मला जन्म देतां । तुला वेणा आल्या
त्याच माझ्या झाल्या । जातांच तूं
तुझ्या मरणाचें । दुःख मांडीवरी
आसवांच्या सरी । पाजितें त्या
अथांग त्या दुःखा । उरीं कवळून
तुज रात्रंदिन । हाकारितें.
स्कंधीं खेळवितें । हातीं जोजवितें
रात्र जागवितें । आठवांत.
घे ग जागवून । घे ग राबवून
ये ग आकारून । अक्षरांत
तुझ्या मरणाचा । घाव अमृताचा
पल्लवूं दे वाचा । क्षुद्र माझी
अशी तरी आतां । सेवा माझी घेईं
हीच भीक आई । मागतें मी

## जेव्हा आठवतात

तेव्हा एकाएकी
घर हें घरच उरत नाही :
तें होतं भिंतींचं, खांबांचं,
खिडक्यांचं, माणसांचं जंगल !
खांबावरचं जुनं घड्याळ
येतं एकाएकी पंजे उगारीत
अंगावर चालून,
खिडक्यांचे गज रोखतात संगिनी,
भिंतींच्या कणाकणांतून रात्र उगवते
माजलेल्या निवडुंगासारखी,
माणसं अक्राळविक्राळ झाडं होऊन
उभीं असतात स्तब्ध, काहीतरी लपवीत :
ऐकूं येते फक्त त्यांच्या मनांतली
कावेबाज कोल्हेकुई,
वरचं छत घार होऊन येतं, पंख पिस्कारीत
भक्ष्य टिपायला माझं
जेव्हा आठवतात—
त्या केविलवाण्या डोळ्यांतील
प्रेमभुकेल्या, थिजू थिजू आशा
आणि तें एकाकी मरण !

## सप्रेम प्रणाम

सप्रेम प्रणाम
विनंति विशेष :
पुढे लिहावया
उरला न श्वास.

विनंति विशेष...
मधे पत्र कोरें :
कोऱ्यांत अव्यक्त
रामायण सारें.

लोभ असावा, हें
इतुकें शेवटी—
इतुकेंच—थांबे
हात सहीसाठी :

...जाणो वाचणारा
जाणेल का पण ?
व्यथेंत कापलें
सहीचें वळण.

## रात्र अशी भिजलेली

रात्र अशी भिजलेली, झाडेंही स्तब्ध उभीं,
सजल श्याम मेघांतुनि व्याकुळता मूर्त नभीं,
जाइजुई म्लानमुखें श्वास आर्त सोडितात,
नकळतांच कळ उमटे माझ्याही अंतरांत :

कळ उमटे आणि उठे एक स्मृती नकळतांच,
व्याकुळता सोडुनि करि मनमयूर गोड नाच,
रात्रीच्या अश्रूंचें द्रव प्रसन्न होइ क्षणीं,
काय उतूं जाइ ? हसे जाइजुई बहरांतुनि.
शपथ सुटे झाडांची : तींहि अतां डोलतात,
पानेंही थरथरून अपुल्याशी बोलतात.

आठवलें गुज आणी ती पहाट न्हालेली,
दरवळलें आसमंत—रात्र अशी भिजलेली !

## वेगळी

पंख असून जमिनीला खिळणारी मी वेगळी
तुटलेल्या पंखांनी झेप घेणारी वेगळी
डोळे बांधून पाहाणारी मी वेगळी
उघड्या डोळ्यांनी न पाहाणारी वेगळी
संतप्त वाणीला मुकी ठेवणारी वेगळी
निःशब्द निःश्वासांचे ग्रंथ लिहिणारी वेगळी
सुखाला सावत्र म्हणत दूर लोटणारी वेगळी
दुःखाला सख्खं म्हणून जवळ घेणारी वेगळी :
या साऱ्या वेगळ्यांच्या वाटाहि वेगळ्या
सुखाचा दुःखाचा काटाहि वेगळा

एकच जागा आहे निमुळत्या टोकाची
तिथेच भेट होते या सगळ्या वेगळ्यांची :
सगळ्या वेगळ्या तेथे एकत्र जमतात,
एकमेकींकडे पाहून उदास हसतात,
क्षणभर भेटतात वेगळेपणीं जायला,
मी वेगळी उरतें ती भेट पहायला !

# दोन वाजून वीस मिनिटें झालीं तरी

दोन वाजून वीस मिनिटें झालीं तरी
झोप डोकावत नाही डोळ्यांच्या कोपऱ्यांत सुद्धा
भित्र्या झोपेला भिववत भिववत
रात्र घोंगावत येते चोहीकडून, थंड अथांग काळी :
दोन डोळे धजत नाहीत, पुरत नाहीत तिला पहायला
आणि पहायचा धीर केलाच तर
रात्र अशी रोरावते भोवती
की भीतीने झोपेला हजार डोळे फुटतात
आणि आ वासते रात्र विश्वरूप दाखवायला :
विराट काळोखांतून दिसूं लागतात
एकेक विश्वें रक्त गोठवणारीं :
अधू माणसांचें विश्व, सरपटणाऱ्या माणसांचें विश्व,
मनुष्यभक्षक माणसांचें, झुरळी माणसांचें,
चिरडणाऱ्यांचें, चिरडलेल्यांचें !
हीं सारीं विश्वें माझ्या भोवती गरगरतात,
मलाहि गरगरवतात चक्रावर घातल्यासारखीं :
चक्रांत भोवंडतां भोवंडतां दिसतात
तोंडवळे, परक्यांचे, ओळखीचे, नात्याचे, स्वतांचेसुद्धा.
कासावीस प्राण, तारवटले डोळे शोधतात शोधतात—
एखादा आधार की ज्यानं
ही गिरकी, ही भोवळ थांबेल :
भोवळ थांबत नाही; पण हजार डोळ्यांतून
वाहतात हजार पूर आंतल्या आंत जिरून जाण्यासाठी

डोळे कोरडेच जळजळतात, ठणकतात,
उध्वस्त झोपेचे तुकडे जुळवीत
पापण्या फडफडतात दीनवाण्या
दोन वाजून वीस मिनिटें झालीं तरी.

## ओढाळ मेघ

ओढाळ मेघ, ओढाळ हवा,
हिरव्या रंगाचा ओढाळ गारवा,
मातीला भरतीचा ओढाळ ओलावा,
मन म्हणतें, "सावध, आता
ओठावर नकारच हवा."

## आताशी मी नसतेंच इथे

आताशी मी नसतेंच इथे
तशी अजून माझी येजा असली तरी.
मला ना? आहेत की सगळीं—
पण माझ्या कांही लक्षांतच रहात नाही :
आताशी मी नसतेंच इथे.

कुठे म्हणून काय विचारतां?
जसं कांही तुम्हांला ठाऊकच नाही!
बाकी नसेलहि म्हणा—
त्या गांवच्या वाटेला फारसं कुणी जातही नाही
तिथं घर म्हणतां? आहे की—
इतकं मोठं, इतकं मोठं :
त्या घराला भिंती नाहीत;
छत ना? आहे-नाहीचं,
तसलाच उंबरठा :
त्यावरून वाहाते नदी;
नदींत खेळतात चंद्र, चांदण्या;
मी ना? काठाकाठाने निर्माल्य वहातोय ना
त्यांतच असतें कुठे तरी—
त्यांत आणि निर्माल्याच्या ताज्या ताज्या स्वप्नांत!
आहे ना सोबत—आपल्या...त्या...ह्यांची.
नांवहि आहे त्यांना—
पण मला आठवत नाही.

हळूहळू तुटतंय रेशीम—काचणारं,

आता गळा मोकळा होतोय,
ओठापर्यंत आलंय गाणं—म्हणूं का ?
यमुनेच्या डोहांत कात्यायिनी व्रत केलं
तेव्हाचं गाणं.
वस्त्रं केव्हाच गेली आहेत कदंबावर
अंतर्पट व्हायला—सावधान—
मी झालेंय निळं गाणं—निळ्या नदींत वाहणारं
निर्माल्याबरोबर.

मी आताशी नसतेंच इथं
तशी माझी ये-जा असली तरी !

## काळ रांगतो

दुदू नि दुपटीं, तिटी नि काजळ
काळ रांगतो बोबडकांदा
म्हणे, "लपुं नको लिंबोनीच्या
झाडामागे लबाड चांदा."

काजळभरल्या, दूधमाखल्या
गालांवरती ओठ टेकुनी
जावळांतुनी बोटे फिरवित
बळ कसलें हा घेतो शोषुनि ?

मरगळलेली दृष्टी विसरुन
पुन्हा चहुकडे लुकुलुकु बघतो,
माथ्यावरचा विसरुन कापुस
नवा खुळखुळा हवाच म्हणतो.

काळ रांगतो मीहि रांगतें
दुदू-मिसळल्या गोष्टी चाखित,
त्या लुकलुकत्या डोळ्यांमधलें
काजळ सर्वांगाला माखित !

## तुझ्या संगती यावया

तुझ्या संगती यावया
असें धपापतें ऊर :
लाजभयाचें परंतू
उभें समोर काहूर.

तुझ्या संगती यावया
रूपें तरी किती घ्यावीं ?
(भय लोकांचें, माझेंहि)
स्वयें मोडावीं, चुरावीं.

अंतीं संगें यावयास
तुझी मनोव्यथा होतें,
लाज-भय चुकवाया
तुझ्या मनांत लपतें :

तुझ्या मनांत लपतां
होतें सुंदर सुंदर
आणि निर्भय ! येऊं ना
अशी संगें निरंतर ?

## त्या रस्त्यावर

बऱ्या नि वाइट या रस्त्यांच्या
पलीकडेही रस्ता आहे एक खऱ्याचा :
कधी फुलांचा कधि काट्यांचा
परंतु बहुधा नेहमीच तो
असे सुऱ्यांचा.

त्या रस्त्यावर भेट आपुली
होते जेव्हा संकेताविण
संकेताने :
सुऱ्यासुऱ्यांच्या पात्यांवरुनी
भान विसरुनी जातों चालत
सहजपणाने, निर्भयतेने;
पात्यावरच्या त्या भेटींतिल
दूरत्वाच्या क्षणाक्षणांतुन
मिळे जवळपण—
व्योम-धरेचें सहज जवळपण :
जवळपणाच्या त्या तेजावर
क्रमितों आपण
वेगवेगळे रस्ते अपुले
बरे नि वाइट व्यवहाराचे जे नित्याचे
सहजपणाने :
त्या रस्त्यावर भेट आपुली
होते जेव्हा संकेताविण
संकेताने.

## चाफ्याच्या झाडा

चाफ्याच्या झाडा, चाफ्याच्या झाडा,
कां बरं आलास आज स्वप्नांत?
तेव्हाच तर आपलं नव्हतं का ठरलं?
दुःख नाहि उरलं आता मनात.
पानांचा हिरवा, फुलांचा पांढरा
रंग तुझा रंगतोय माझ्या मनांत;
केसांत राखडी, पायांत फुगडी
मी वेडिभाबडी तुझ्या मनांत.

चाफ्याच्या झाडा, चाफ्याच्या झाडा,
नको ना रे पाणी डोळ्यांत आणू;
ओळखीच्या सुरांत, ओळखीच्या तालांत
हृदग्याचीं गाणीं नको म्हणू.

तुझ्याच आळ्यांत एक पाय तळ्यांत
एक पाय मळ्यांत खेळलेंय ना?
जसं कांही घोड्यावर तुझ्याच फांद्यावर
बसून आभाळांत फिरलेंय ना?
चाफ्याच्या झाडा, चाफ्याच्या झाडा
पानांत मनांत खुपतंय ना
काहीतरी चुकतंय, कुठं तरि दुखतंय:
तुलाहि कळतंय, कळतंय ना?

चाफ्याच्या झाडा, चाफ्याच्या झाडा
हसून सजवायचं ठरलंय ना?
कुठं नाहि बोलायचं, मनांत ठेवायचं:
फुलांनी ओंजळ भरलीय ना?

# एस० ओ० एस०

दाट धुक्याच्या पांढऱ्या वणव्यांत सापडून
गुदमरत होते प्राण
म्हणून पाठविला एस० ओ० एस०
आणि वाट पहात होतें सुटकेची :
दिसला लाल दिवा नेमक्या वेळीं
आणि मीं घेतली सुरक्षित दिशा,
पोचलें सुरक्षित जागीं !
—पण सुटका झालीच नाहीं.
आता वाटतें, मीच पेटवलें असतें रान चोहीकडून
आणि पाठवला असता एस० ओ० एस० तर
—तर लाल ज्वालांत लाल दिवा दिसला नसता,
सुरक्षितपणाच्या घोर शापांत
प्राण असा फसला नसता !

## इतकी बेपर्वाई

इतकी बेपर्वाई आकाशालाच शोभते :
तूंहि स्वतःला आकाश समजूं लागलास का
मी म्हटलें म्हणून ?
कितीहि म्हटलें परस्परांना अलौकिक, असामान्य
तरी अखेर मुळें मातींतच
हें तुला कळत नाही असें का मी म्हणतें ?
एक विचारूं ?
कलंदराला हवीच का असली बेपर्वाई ?
आकाशाची पोकळ मोहक निळाई ?
चिडलें नाही रे :
चंद्रसूर्य पहातें ना मी तुझ्याच डोळ्यांत !
चंद्रसूर्यांना कां दिसावीं आसवें कोणाचीं ?
मातीचे मुके कढ मातीच जाणे !
पण तूं आकाशच रहा :
नाहीतर डोळे उचलून पहायचे तरी कोणाकडे ?

## नजर

कळसावर नजर ठेवून जगत आलें :
नजर राहिली कळसावर;
जिणें पायदळीं पडलें !

## निळा पक्षी

निळा पक्षी
खोल वक्षीं
कोरतो नक्षी :
मनच साक्षी !

## हस्तांदोलन

नियतीने करायला लावलें तें मीं निमूट केलें,
नियतीने करूं नको म्हटलें तेंहि धृष्टपणें केलें:
नियतीच्या डाव्या पायाची ठोकर खात
मी उजव्या पायाने तिला ठोकरून दिलें.

आता आमोरासमोर उभ्या आहोंत दोघी
आधी कुणाचा हात येतो पुढे
हस्तांदोलनासाठी तें अजमावीत!

## लक्ष्मणरेषा

सीतेपुढे एकच ओढली रेषा लक्ष्मणाने,
तिने ती ओलांडली आणि झालें रामायण.
आमच्यापुढे दाही दिशा लक्ष्मणरेषा :
ओलांडाव्याच लागतात,
रावणांना सामोरें जावेंच लागतें!
एवढेंच कमी असतें :
कुशींत घेत नाही भुई दुभंगून!

## माझ्यासाठीं

चंद्रसूर्य सर्वांचे-सर्वांसाठी,
इंद्रधनुष्य खास कुणासाठी,
पांढुरके, अबोली मेघ
असेच अलबत्यागलबत्यांसाठी,
लुकलुकणाऱ्या चार तारका
चुकल्यामुकल्या वाटसरासाठी;
फक्त निळा निळा रंग
एकच एक—निसंग
माझ्यासाठी, माझ्यासाठी !

## जपायचा एकटेपणा

शब्द माझे लागले का जिव्हारीं ?
नको पाहूं असा.
डोळ्यामधे साचलें रे पाणी :
नको हसूं असा.

नव्हतेंच बोलायचें तसें
बोलूनीया गेलें,
नकळत मनामधे कांही
तोलूनीया गेलें.

तुझ्यासारखाच पहातें
मीहि जपूं एकटेपणा
लपवीत डोळ्यांतलें पाणी :
नको म्हणूं गुन्हा.

जपायचा एकटेपणा
एकामेकापासूनीहि
एवढेंच—एवढेंच ना
आता हातीं राही !

## अजिंठा

डोंगरांचे आग्रही कडे किंचित आत वाकलेले,
वृक्षांचे हिरवे करडे तोल किंचित बाहेर झुकलेले,
एक उभट गोल आरसा मधे झुले चौकटीविना :
लाल हिरवा पिवळा निळा त्यांत नक्षीदार हलता मिना.

तथागताची अथांग शांति, प्रकाशवेधी विलक्षण हास्य,
नर्तकीच्या अंगोपांगांच गर्द गूढ रंगलास्य,
संन्यास-विलास, दुःख-शांति, विचित्र वेदना-संवेदना,
दगडामधल्या कणाकणांतली शापित सुंदर स्थिर चेतना.

अर्थ सांगणारा-ऐकणारा भाबडा, भाबडा आनंद, भाबडे कढ;
मुक्त आहे येथलें क्षितिज आणि समजूतदार दगड !

## थोडी उरली आहे वाट

थोडी उरली आहे वाट मनस्विनी,
थोडी सोस गडे कळ,
थोडा वेळ टिकवून धर
आतापर्यंतचें स्वप्नबळ.

म्हणोत तुला स्वप्नवेडी
खुळ्या स्वप्नांत रंगणारी :
ज्याचें त्यास साजून दिसतें;
म्हणोत कांही म्हणणारीं.

स्वप्नांत नाकारलीं नाहीस देणीं,
उधळलेंस आपलें वैभव असें :
आकाश लवलें स्वीकारायला
हें भाग्य का असेंतसें ?

पूस डोळे मनस्विनी,
तुझें असणें एक स्वप्न;
नकळत जायचें पलीकडे :
स्वप्नांतून दुसरें स्वप्न.

REFBK-0016871
REFBK-0016871

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ५००७९ वि: काव्य